**<u>ठळक बातम्या</u>**

- रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरूणांना सक्षम बनवण्याला केंद्र सरकार महत्व देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन

- उत्तर प्रदेशातल्या पिलभीत जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत तीन खलिस्तानी अतिरेकी ठार

**आणि**

- देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीची तीव्र लाट

**<><><><><>**

तरूणांच्या क्षमता आणि कलागुणांचा पूरेपूर वापर करून या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरूणांना सक्षम बनवण्याला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आयोजित रोजगार मेळाव्याला संबोधित करत होते. देशभरात ४५ ठिकाणी असे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब

कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारख्या विविध मंत्रालयांमध्ये ७१ हजारांहून अधिक नियुक्तीपत्राचं वाटप करण्यात आलं.

मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत अभियान, स्टार्टअप इंडिया, स्टँड अप इंडिया, डिजिटल इंडियासारख्या योजनाही युवांना केंद्रस्थानी ठेवून बनवण्यात आल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. या रोजगार धोरणांमुळं ग्रामीण भागांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत असल्याचंही ते यावेळी म्हणाले. तसंच महाराष्ट्रात केंद्रीय मंत्री नितिन गडकरीं यांनी नागपूरमध्ये आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यामध्ये नियुक्तीपत्रांचं वाटप केलं. आयुष्यामध्ये प्रामाणिकपणा, विश्वसनीयता आणि पारदर्शकता ही क्षमता आहे. शासकीय नोकऱ्यांमध्ये नवनियुक्तांनी आपल्या अंगभूत तसेच व्यक्तिगत कौशल्याचा विकास करून केवळ नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हावे असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या केंद्रीय राखीव पोलीस दल ग्रुप सेंटर हिंगणा येथे आयोजित रोजगार मेळाव्यात केल. यावेळी २५७ जणांना नागपूर मधील रोजगार मेळाव्यात गडकरींच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरित करण्यात आलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नाताळ उत्सवात सहभागी होणार आहेत. भारतीय कॅथोलिक बिशप्स परिषदेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ख्रिस्ती समाजाचे प्रमुख नेते, चर्चचे कार्डिनल्स आणि बिशप्स यांच्याशी चर्चा करतील. कॅथोलिक चर्चच्या मुख्यालयातील प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

<><><><><>

राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाची प्रगती आणि विकासामध्ये शेतकऱ्यांच महत्व आणि भागिदारी अधोरेखित करणं, अन्न सुरक्षा, शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी परंपरा जपण्यासाठी शेतकऱ्यांचं योगदान कसं महत्वाचं आहे यासाठी आजचा दिवस साजरा केला जातो. शेतकऱ्यांची महत्त्वाची भूमिका ओळखून सरकारने त्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी आणि शाश्वत कृषी विकासासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. देशात यंदा विक्रमी ३३२ दशलक्ष टनापेक्षा जास्त अन्नधान्याचं उत्पादन झाले आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज चौधरी चरणसिंग यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी ते म्हणाले की, २००१ सालापासून चौधरी चरणसिंह यांची जयंती किसान दिन म्हणून साजरा केला जातो. चौधरी चरणसिंह यांनी शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाबरोबरच देशाच्या विकासासाठी आपलं जीवन समर्पित केले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही समाज माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे की, चौधरी चरणसिंह गरीब आणि शेतकऱ्यांचे सच्चे हितचिंतक होते.

<><><><><>

विमानानं प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी नागरी उड्डाण मंत्रालयानं विमान तळांवर ‘उडान यात्री कॅफे’ सुरू करण्याची घोषणा केली आहे. विमान तळांवर वाजवी दरात खाद्यपदार्थ आणि पाण्याची सोय होणार असल्यानं

प्रवाशांसाठी हा मोठा दिलासा आहे. प्रायोगिक तत्वावर कोलकता विमान तळावर सुरू केलेला हा उपक्रम यशस्वी झाल्यानं देशात अन्य विमान तळांवर सुद्धा हा उपक्रम राबवला जाईल.

**<><><><><>**

दिल्लीत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपने आज दिल्ली सरकारविरुद्ध आरोपपत्र जारी केले. सत्ताधारी आप सरकारनं नागरिकांना दिलेली आश्वासनं पूर्ण केले नाहीत असा आरोप करत भाजपचे ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर, दिल्ली भाजपचे प्रमुख विरेंद्र सचदेवा आणि अन्य काही नेत्यांनी यासंदर्भातील पुरावे सादर केले आहेत. आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी नागरिकांना खोटी आश्वासनं देत त्यांची दिशाभूल केल्याचा आरोप अनुराग ठाकूर यांनी केला आहे. यमुना नदीत होणारं प्रदूषण, दिल्लीतील हवेची ढासळती गुणवत्ता, भ्रष्टाचारासह अनेक मुद्द्यांवरून ठाकूर यांनी आप सरकारवर टीका केली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या पिलभीत जिल्ह्यात आज सकाळी खलिस्तानी अतिरेकी आणि पोलिसांच्या चकमकीत तीन अतिरेकी ठार झाले. हे तिन्ही खलिस्तानवादी अतिरेकी १९ डिसेंबर रोजी पंजाबच्या गुरुदासपूर जिल्ह्यातल्या एका पोलीस चौकीवर झालेल्या हातबॉम्ब हल्ल्यात सहभागी होते. पिलभीत जवळच्या भागात खलिस्तानवादी अतिरेकी असल्याची माहिती मिळाल्यानंतर पंजाब आणि उत्तर प्रदेश या दोन्ही राज्याच्या पोलिसांनी संयुक्तपणे शोधमोहिम सुरु केली. पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी गोळीबार सुरु केला. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी

केलेल्या गोळीबारात तीन दहशतवादी ठार झाले. खलिस्तानी कमांडो फोर्सशी संबंधित असलेल्या या अतिरेक्याकडून पिस्तुलही जप्त केली.

<><><><><>

देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये सध्या थंडीची तीव्र लाट सुरु आहे. हवामान विभागानं, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि मध्य प्रदेशातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. श्रीनगरमध्ये काल रात्री निचांकी ४.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली असून डोंगराळ भागात सर्वत्र बर्फ साचला आहे. पंजाबच्या आदमपूर मध्ये १ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दिल्ली आणि परिसरात थंडीबरोबरच हलक्या पावसाच्या सरी कोसळल्या तर सर्वत्र दाट धुके साचले आहे. धुक्यामुळे अमृतसर आणि लुधियाना परिसरातही दृश्यमानता कमी झाली आहे. राजस्थानच्या काही भागात चक्रीवादळाचाही धोका वर्तवण्यात आला आहे तर उत्तराखंडमध्येही कडाक्याच्या थंडीबरोबर पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. लडाखच्या अनेक भागात २७ ते २९ डिसेंबर दरम्यान जोरदार बर्फवृष्टी होण्याची शक्यता असून पर्यटकांनी त्या ठिकाणच्या स्थितीची माहिती घेऊनच आपल्या फिरण्याचं नियोजन करावं  असं आवाहनही करण्यात आलं आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये एकदिवसीय सामन्यांत एका वर्षात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम स्मृती मंधानानं नोंदवला आहे. काल वडोदरामध्ये वेस्ट इंडिज संघाबरोबर झालेल्या सामन्यात स्मृतीनं ९१ धावा केल्यामुळे तिनं या

वर्षी केलेल्या धावांची संख्या १ हजार ६०२ झाली आहे. त्यामुळे स्मृतीनं दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोलवार्टचा एक हजार ५९३ धावांचा विक्रम मोडला आहे.

<><><><><>

पाकिस्तान क्रिकेट मंडळानं २०२५च्या आयसीसी चँपियन्स करंडक स्पर्धेतील भारताच्या सामन्यांसाठी, तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब अमिरात या देशाची निवड केली आहे. सुरक्षाविषयक कारणांमुळे भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे पाकिस्ताननं हा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे भारताचे सर्व सामने आता संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळले जाणार आहेत. त्या देशात कोणत्या ठिकाणी हे सामने होणार हे पाकिस्तान क्रिकेट मंडळानं स्पष्ट केलं नसलं, तरी दुबईमध्ये हे सामने होतील, अशी शक्यता आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजे आयसीसीसाठी स्पर्धेचं वेळापत्रक निश्चित करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

<><><><><>

अमेरिकन अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारणारे डोनाल्ड ट्रम्प यांनी कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रासाठीचे सल्लागार म्हणून भारतीय नागरिक  श्रीराम कृष्णन यांची निवड केली आहे. ते अमेरिकन सरकारच्या कृत्रिम बुद्धीमत्ता धोरणासाठीचे प्रमुख सल्लागार म्हणून काम पाहणार आहेत. श्रीराम कृष्णन यांच्यावर व्हाईट हाऊसच्या कृत्रिम बुद्धीमत्ता आणि क्रिप्टो झार क्षेत्रात नवीन धोरण ठरवण्याचीही जबाबदारी देण्यात आली आहे.  चेन्नईमध्ये जन्मलेले

श्रीराम कृष्णन हे भारतातून पदवी घेतल्यानंतर अमेरिकेत स्थायिक झाले होते.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेत काल वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये १९ नागरीक ठार झालेत. लिम्पोपो भागात एन १ महामार्गावर सात गाड्या एकमेकांवर आदळून झालेल्या भीषण अपघातात सात जण ठार तर पाच जखमी झालेत. तर केप प्रांतात ट्रक आणि प्रवासी टॅक्सी यांच्यातच धडक होऊन झालेल्या अपघातात बारा जणांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

सर्बियात बेलग्रेडमध्ये काल २९ हजारपेक्षा जास्त जणांनी एकत्र येऊन सरकारविरोधात निदर्शनं केली. गेल्या काही वर्षांमध्ये या देशात झालेलं हे सर्वांत मोठं आंदोलन ठरलं आहे. नोव्ही सॅड इथल्या रेल्वेस्थानकाचं छत कोसळून पंधरा जणांचा मृत्यू झाल्यानंतर त्या देशभरात निदर्शनं सुरू आहेत.

**//<><><><><>//**